मंगळवार दि. २३ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जगद्गुरु हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# विधान परिषद निवडणूकीत महायुतीची दणदणीत सरशी

## १७ पैकी १६ जागांवर विजय | छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघातून सुहास शिरसाट विजयी

**जालना | प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीने एकतर्फी वर्चस्व प्रस्थापित करत १७ पैकी तब्बल १६ जागांवर विजय मिळवला आहे. या निकालामुळे राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये महायुतीची ताकद पुन्हा अधोरेखित झाली असून महाविकास आघाडीला मोठा धक्का बसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

या निवडणुकीत एकूण १७ जागांसाठी प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यापैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार यापूर्वीच बिनविरोध निवडून आले होते. उर्वरित ११ जागांसाठी झालेल्या मतदानाचा निकाल रविवारी जाहीर झाला. या निकालात महायुतीने जवळपास सर्वच मतदारसंघांमध्ये विजय मिळवत आपले वर्चस्व कायम ठेवले.

छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात भाजपचे उमेदवार सुहास शिरसाट यांनी विजय संपादन केला. या विजयामुळे मराठवाड्यातील महायुतीचे राजकीय बळ आणखी मजबूत झाल्याचे मानले जात आहे.

महायुतीच्या विजयाच्या लाटेत नाशिक मतदारसंघाचा निकाल मात्र विशेष चर्चेचा ठरला. येथे शिवसेनेच्या अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांच्या विरोधात भाजपचे बंडखोर उमेदवार गोकुळ गिते यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती.

अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या लढतीत गोकुळ गिते यांनी विजय मिळवत महायुतीच्या अधिकृत उमेदवाराचा पराभव केला. त्यामुळे महायुतीला एकमेव पराभवाचा सामना करावा लागला असून राज्यातील राजकीय वर्तुळात या निकालाची मोठी चर्चा सुरू झाली आहे.

**भाजप सर्वात मोठा पक्ष**

निवडणुकीच्या अंतिम निकालानंतर भाजपने सर्वाधिक ११ जागांवर विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. शिवसेनेला ३ जागा मिळाल्या असून राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागांवर यश मिळाले आहे. नाशिकमधून अपक्ष म्हणून निवडून आलेले गोकुळ गिते हे भाजपचे बंडखोर उमेदवार असल्याने त्यांचा विजयही विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

भाजपच्या विजयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाची पकड मजबूत असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि इतर राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या निकालांकडे महत्त्वाच्या राजकीय संकेतांच्या दृष्टीने पाहिले जात आहे.

**सहा उमेदवार बिनविरोध**

ठाणे, यवतमाळ, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर आणि अहिल्यानगर या मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. त्यामुळे निकालापूर्वीच महायुतीच्या खात्यात सहा जागांची भर पडली होती.

**छत्रपती संभाजीनगर-जालन्यात भाजपचा विजय**

मराठवाड्यातील महत्त्वाच्या छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात भाजपचे सुहास शिरसाट यांनी विजय मिळवला. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जनप्रतिनिधींचा मोठा पाठिंबा त्यांना मिळाल्याचे निकालातून स्पष्ट झाले.

या मतदारसंघात जवळपास ९८.९० टक्के इतके विक्रमी मतदान झाले. लोकप्रतिनिधींनी मोठ्या उत्साहाने मतदानाचा हक्क बजावल्याने ही निवडणूक विशेष लक्षवेधी ठरली.

**विविध मतदारसंघांमध्ये उच्चांकी मतदान**

या निवडणुकीत अनेक मतदारसंघांमध्ये जवळपास शंभर टक्के मतदानाची नोंद झाली. नाशिक आणि भंडारा-गोंदिया येथे १०० टक्के मतदान झाले. सांगली-सातारामध्ये ९९.८९ टक्के, परभणी-हिंगोलीमध्ये ९९.७८ टक्के, सोलापूरमध्ये ९९.६८ टक्के, धाराशिव-लातूर-बीडमध्ये ९९.४९ टक्के मतदानाची नोंद झाली. याशिवाय नागपूरमध्ये ९८.४४ टक्के, जळगावमध्ये *(पान २ वर)*

# जालना जिल्ह्यासाठी हवामान सतर्कतेचा इशारा; २३ व २४ जूनला यलो अलर्ट, नागरिकांनी दक्षता बाळगावी

*विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता; जिल्हा प्रशासनाचे आवाहन*

**जालना | प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यासाठी प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा (मुंबई) यांनी पुढील काही दिवसांसाठी हवामानाचा सतर्कतेचा इशारा जारी केला असून, २३ आणि २४ जून रोजी जिल्ह्यात यलो अलर्ट घोषित करण्यात आला आहे.

या कालावधीत जिल्ह्यातील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस, मध्यम स्वरूपाचा पाऊस तसेच ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिक, शेतकरी, पशुपालक तसेच ग्रामीण भागातील रहिवाशांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

**पुढील पाच दिवस हवामान अस्थिर**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राने २२ जून रोजी दुपारी १.३१ वाजता जारी केलेल्या अंदाजानुसार, जिल्ह्यात २२ जून रोजी हलका पाऊस अथवा मेघगर्जनेसह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मात्र २३ आणि २४ जून या दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, या काळात विजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि जोरदार वारे वाहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

२५ जून रोजी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता असून, २६ जून रोजीही मेघगर्जनेसह हलक्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा**

गेल्या काही दिवसांपासून जालना जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या मोठ्या प्रमाणावर खोळंबल्या आहेत. कपाशी, सोयाबीन आणि इतर पिकांची लागवड करणारे शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

अशा परिस्थितीत पुढील काही दिवसांतील पावसाचा अंदाज शेतकऱ्यांसाठी दिलासादायक मानला जात असला तरी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यांचा धोका लक्षात घेता विशेष काळजी घेण्याची आवश्यकता *(पान २ वर)*

# जालना मनपाच्या महिला व बाल कल्याण विभागाकडून विविध उपक्रमांचे आयोजन; वटवृक्ष वाटप, आरोग्य शिबिर व 'हिरकणी कक्षा'चे उद्घाटन

वटसावित्री पौर्णिमेचे औचित्य; एकल महिलांचा सन्मान, कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी आणि १०० दिवसांच्या कार्यअहवालाचे होणार प्रकाशन

**जालना | प्रतिनिधी**

वटसावित्री पौर्णिमेच्या निमित्ताने जालना शहर महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण विभागाच्या वतीने विविध सामाजिक, आरोग्यविषयक व महिला सक्षमीकरणाशी निगडित उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २४ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता महानगरपालिका मुख्य कार्यालयात हा विशेष कार्यक्रम संपन्न होणार असून, त्यामध्ये वटवृक्ष वाटप, मोफत आरोग्य तपासणी शिबिर, 'हिरकणी कक्षा'चा शुभारंभ तसेच महिला व बाल कल्याण विभागाच्या १०० दिवसांच्या कार्यअहवालाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती तथा भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष सौ. संध्या संजय देठे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच महिलांच्या सन्मानाला प्राधान्य देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमात एकल महिलांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. यासोबतच नवनिर्वाचित महिला नगरसेविका, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान () अंतर्गत कार्यरत महिला बचत गटांच्या अध्यक्ष व सचिव यांना वटवृक्षाची रोपे भेट देण्यात येणार आहेत.

एकल महिलांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे, त्यांना सामाजिक मुख्य प्रवाहात आणण्यास प्रोत्साहन मिळावे आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे सौ. देठे यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली वटवृक्षाची रोपे महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या पुढाकारातून एका सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी तसेच स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात हृदयविकार तज्ज्ञ डॉ. कृष्णाजी कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आरोग्य तपासण्या करण्यात येणार आहेत.

नियमित आरोग्य तपासणीमुळे आजारांचे लवकर निदान होऊन *(पान २ वर)*

# महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा बालभारतीत कथित अवमान; डॉ. विजय कुमठेकर यांचा तीव्र निषेध

इयत्ता तिसरीच्या पाठ्यपुस्तकातील मजकुरावर आक्षेप; तातडीने दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**जालना | प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या ऐतिहासिक शैक्षणिक कार्यासंदर्भात बालभारतीच्या इयत्ता तिसरीच्या पाठ्यपुस्तकात जाणीवपूर्वक खोडसाळपणा करण्यात आल्याचा गंभीर आरोप प्रा. डॉ. विजय कुमठेकर यांनी केला आहे. या प्रकाराचा त्यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत संबंधित मजकुराची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

डॉ. कुमठेकर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडेवाडा येथे देशातील पहिली मुलींची शाळा सुरू करून भारतीय शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक कार्य केले. या घटनेची नोंद विविध ऐतिहासिक दस्तऐवज, महाराष्ट्र शासनाच्या नोंदी तसेच ब्रिटिशकालीन अभिलेखांमध्येही आढळून येते.

मात्र, बालभारतीच्या इयत्ता तिसरीच्या 'आपल्या सभोवतालचे जग भाग २' या पाठ्यपुस्तकामध्ये करण्यात आलेल्या उल्लेखाबाबत त्यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांच्या मते, पाठ्यपुस्तकातील नोंदीमुळे महात्मा फुले यांच्या कार्याचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते.

डॉ. कुमठेकर यांनी सांगितले की, महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारची नोंद अधिक गंभीर मानली जात आहे. समाजसुधारकांच्या कार्याचा गौरव करण्याऐवजी त्यांच्या योगदानाबाबत




संभ्रम निर्माण होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर परिणाम होण्याची भीती शाळा सुरू झाल्यानंतर संबंधित पुस्तके विद्यार्थ्यांच्या हातात पोहोचली असून, अशा स्वरूपाच्या मजकुरामुळे विद्यार्थ्यांच्या मनात महात्मा फुले यांच्या कार्याबाबत चुकीची प्रतिमा निर्माण होण्याची शक्यता असल्याचे डॉ. कुमठेकर यांनी म्हटले आहे.

''लहान मुलांच्या मनात महात्मा फुले यांच्याविषयी न्यूनगंडात्मक दृष्टिकोन निर्माण होऊ नये. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची उंची जाणीवपूर्वक कमी करण्याचा हा प्रयत्न असल्याचा संशय निर्माण होतो,'' असे त्यांनी नमूद केले. बालभारती प्रशासनाशी संपर्काचा प्रयत्न या संदर्भात बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे डॉ. कुमठेकर यांनी *(पान २ वर)*

# दारूबंदी करिता हेलस गावातील रणरागिणींचा एल्गार..



**मंठा - प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील मौजे हेलस येथील महिलांनी पोलीस ठाणे गाठत (दि.२२) अवैद्य दारू विक्री होत असल्याचे निवेदन देत दारू विक्री कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. असून अवैद्य धंदे आणि दारू विक्रीमुळे हेलस गावातील तरुण व्यसनाधीन तर तळीराम मद्य पिऊन नग्न गावभर फिरत असून महिलांना बाहेर पडणे जिकरीचे झाले आहे.

अवैद्य दारू विक्रोमुळे बहुतांश गावकऱ्यांचे संसार उघड्यावर काहींचे तर मोडले पिता आणि पुत्रामध्ये तुडुंब हाणामारी होत आहे. दारू पिऊन रोडवर येजा करणाऱ्या महिलांना शाळेतील मुलींना पाहून शिवीगाळ करून अर्वाच्य भाषेत बोलणे यामुळे गावातील महिलांना त्रासाला सामोरे जावे लागत असून रोडवर फिरणे कठीण झाले आहे. या त्रासाला कंटाळून हेलस गावातील महिलांनी मंठा पोलीस ठाणे गाठून गावातील दारूबंदी करिता एल्गार पुकारला या निवेदनावर गावातील महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गटशिक्षणाधिकाऱ्यांचा अचानक धडक दौरा; वर्गातच घेतला 'गुणवत्तेचा क्लास'

**भोकरदन | प्रतिनिधी**

शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत शासन गंभीर असताना भोकरदनचे गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके यांनी आज जि.प. प्राथमिक शाळा बरांजळा लोखंडे येथे अचानक भेट देत थेट वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. केवळ कागदोपत्री तपासणी न करता स्वतःविद्यार्थ्यांना शिकवत त्यांनी शिक्षकांसमोरच ''कृतीतून शिक्षण'' या संकल्पनेचा आदर्श ठेवला.

**वर्गातच रंगला गणिताचा प्रयोग..**

भेटीदरम्यान वाळके यांनी इयत्ता सहावीच्या वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या आवडी-निवडी,कलागुण आणि शैक्षणिक प्रगतीची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी स्वतः गणित विषयाचे प्रात्यक्षिक सादर करत विद्यार्थ्यांना ५० मिली, २०० मिली, ५०० मिली आणि १००० मिली या मापनांची ओळख करून दिली.दूध, पाणी व इतर द्रव पदार्थ व्यवहारात कसे मोजले जातात,याचे प्रत्यक्ष उदाहरणांसह मार्गदर्शन केले.विशेष म्हणजे विद्यार्थ्यांकडूनही प्रात्यक्षिक करून घेतल्याने वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

**शाळेच्या प्रत्येक घटकाची पाहणी..**

यावेळी शाळेतील भौतिक सुविधा, मोफत गणवेश, पाठ्यपुस्तक वितरण, शालेय पोषण आहार, स्वच्छ पिण्याचे *(पान २ वर)*

# टेंभुर्णीत मृग नक्षत्र कोरडा पावसाचा थेंब नाही

**दत्ता देशमुख**

मृग नक्षत्राला ९ जूनपासून सुरुवात होऊनही तोच संपला तरीही टेंभुर्णी परिसरात पाणी पडला नाही त्यामुळे टेंभुर्णीसह जाफ्राबाद तालुक्यात अद्याप पावसाचा एकही थेंब पडलेला नाही. पावसाअभावी परिसरातील ९० टक्के पेरण्या पूर्णपणे खोळंबल्या आहेत. आषाढी एकादशी तोंडावर आली असताना शेतात बी पडले नसल्याने बळीराजाने आता विठ्ठलाकडे पावसासाठी आर्त हाक दिली आहे.

पावसाच्या प्रतीक्षेत असलेली शेते सध्या ओसाड आणि तडे गेलेल्या अवस्थेत आहेत. शेतकऱ्यांनी कर्ज काढून आणलेले बियाणे आणि खते पडून आहेत. काही धाडसी शेतकऱ्यांनी सोशल मीडियावरील हवामानाच्या अंदाजांवर विश्वास ठेवून घाईघाईने कपाशीची धूळपेरणी

**अंदाज फसला, शेतकरी संकटात**

''सोशल मीडियावरील तथाकथित हवामान अंदाजांवर विश्वास ठेवून घाईघाईने धूळपेरणी करत कपाशी बियाण्याची लागवड केली. परंतु अंदाज फसला आणि शेतकरी संकटात सापडला आहे.''

**शेतकरी संतोष औटी**

केली. मात्र, अंदाज फोल ठरल्याने आणि विहिरींना पाणी नसल्याने उगवलेली रोपे आता करपू लागली आहेत. गेल्या वर्षी २२ जून २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे याच काळात ९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. यंदा मात्र शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. शेतीबरोबरच परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही अत्यंत बिकट झाला आहे. गावोगावी विहिरींनी तळ गाठला असून हातपंपांचे पाणी आटले आहे. पाण्यासाठी महिलांना मैलोन्मैल पायपीट करावी लागत असल्याने प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

येत्या चार-पाच दिवसांत पाऊस न आल्यास खरीप हंगाम पूर्णपणे धोक्यात येणार आहे. त्यामुळे पेरणी लांबल्यास प्रशासनाने शेतकऱ्यांना मदत पॅकेज जाहीर करावे, अशी मागणीही परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## संपादकीय....

### गॅस सिलिंडरचा काळाबाजार : अनुदानाची गळती की व्यवस्थेचे अपयश?

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडर हा आज सर्वसामान्य कुटुंबाच्या दैनंदिन जीवनाचा अत्यावश्यक भाग बनला आहे. शासनाकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा उद्देश सामान्य नागरिकांना स्वस्त दरात इंधन उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, परतूर, मंठा आणि जालना जिल्ह्यात घरगुती गॅस सिलिंडरच्या कथित काळाबाजाराबाबत व्यक्त होत असलेल्या तक्रारी आणि संशयांनी वितरण व्यवस्थेच्या पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. जर घरगुती वापरासाठी असलेले अनुदानित सिलिंडर व्यावसायिक आस्थापनांकडे वळवले जात असतील, तर त्याचा सर्वात मोठा फटका सामान्य ग्राहकांना बसतो. घरगुती ग्राहकांना वेळेवर सिलिंडर मिळत नाही, प्रतीक्षा वाढते आणि अनेक वेळा अतिरिक्त पैसे मोजावे लागतात, अशा तक्रारी वारंवार समोर येतात. त्यामुळे ही बाब केवळ गॅस पुरवठ्यापुरती मर्यादित राहत नाही, तर ती सामाजिक न्याय आणि शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीशीही संबंधित ठरते. व्यावसायिक वापरासाठी स्वतंत्र कमर्शियल सिलिंडर उपलब्ध असताना घरगुती सिलिंडरचा वापर होत असल्याच्या तक्रारी जर खऱ्या ठरत असतील, तर तो केवळ नियमभंग नाही तर शासनाच्या अनुदान व्यवस्थेवरील आघात आहे. अशा प्रकारांमुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होण्याबरोबरच प्रामाणिक ग्राहकांनाही त्याचा फटका बसतो.
बोगस ग्राहक नोंदी, मृत अथवा स्थलांतरित व्यक्तींच्या नावावर सिलिंडर उचलले जाण्याच्या तक्रारी अधिक गंभीर आहेत. कारण अशा प्रकारांमुळे वितरण यंत्रणेतील नोंदींची विश्वासार्हता आणि देखरेखीच्या यंत्रणेची कार्यक्षमता यावर प्रश्न निर्माण होतात. आज डिजिटल युगात आधार पडताळणी, ऑनलाइन नोंदी आणि वितरण ट्रॅकिंगची व्यवस्था उपलब्ध असतानाही अशा तक्रारी समोर येत असतील, तर त्या गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. या संपूर्ण प्रकरणात केवळ एजन्सी चालक किंवा वितरक यांच्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत नाही, तर देखरेख करणाऱ्या यंत्रणांची भूमिकाही महत्त्वाची ठरते.

# पाणीटंचाईच्या काळात महानगरपालिकेचा निष्काळजीपणा? जालना शहरात लाखो लिटर पिण्याचे पाणी रस्त्यावर वाया

## लाड चौक येथील मुख्य जलवाहिनीच्या वॉलमधून रात्रंदिवस गळती; 'पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा'च्या घोषणांवर प्रश्नचिन्ह


**जालना । प्रतिनिधी**

एकीकडे पावसाने अद्यापही जालना जिल्ह्याकडे पाठ फिरविल्याने शहरासह ग्रामीण भागात पाणीटंचाईची भीषण समस्या निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत, तर दुसरीकडे जालना शहरातील मुख्य जलवाहिनीमधून रात्रंदिवस मोठ्या प्रमाणात पिण्याचे पाणी वाया जात असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. छत्रपती संभाजीनगर रोडवरील लाड चौक येथील सिग्नलजवळ असलेल्या जलवाहिनीच्या वॉलमधून सातत्याने पाणी गळती होत असून, लाखो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.
सोमवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास ही बाब पुन्हा एकदा निदर्शनास आली. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, चंदनझिरा परिसरातील पाण्याच्या टाकीला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरील वॉलमधून अनेक दिवसांपासून ही गळती सुरू आहे.

**रात्रंदिवस वाहते पाणी; प्रशासन मात्र अनभिज्ञ?**

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, जेव्हा जेव्हा पाणीपुरवठा सुरू होतो, तेव्हा मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर वाहू लागते. अनेक दिवसांपासून हा प्रकार सुरू असतानाही संबंधित विभागाने दुरुस्तीची कोणतीही प्रभावी कारवाई केल्याचे दिसून येत नाही.

शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना दोन ते तीन दिवसांनी पाणीपुरवठा होत असताना दुसरीकडे मुख्य जलवाहिनीतील गळतीमुळे मौल्यवान पिण्याचे



पाणी वाया जात असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

**पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर गंभीर प्रश्न**

जून महिना संपत आला असून जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झालेला नाही. ग्रामीण भागात विहिरींची पाणीपातळी घटत असून शहरातील अनेक भागांमध्येही पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अशा परिस्थितीत शासन आणि प्रशासनाकडून पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा, जलसंवर्धन करा अशा विविध मोहिमा राबविल्या जात आहेत. मात्र दुसरीकडे महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे लाखो लिटर शुद्ध पिण्याचे पाणी रस्त्यावर वाहून जात असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**नागरिकांचा संतप्त सवाल**

''एकीकडे नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जाते, तर दुसरीकडे मुख्य जलवाहिनीतील गळतीकडे दुर्लक्ष केले जाते. याला जबाबदार कोण?'' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.
स्थानिक रहिवाशांनी अनेकदा संबंधित विभागाच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्याचा दावा केला असून, तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

**रस्त्यावर साचणारे पाणीही ठरत आहे धोकादायक**

गळतीमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः सिग्नल चौक परिसरात वाहनचालकांना घसरण्याचा धोका निर्माण होत असून दुचाकीस्वारांना याचा फटका बसत आहे. सततच्या गळतीमुळे रस्त्याचेही नुकसान होत असून भविष्यात खड्डे आणि रस्त्याच्या धुपीची समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जलपुरवठा विभागाने तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज जलवाहिनीतील गळतीची तात्काळ दुरुस्ती करून होणारी पाण्याची नासाडी थांबविणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत. शहरात संभाव्य पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता जलपुरवठा विभागाने नियमित पाहणी करून अशा गळतीच्या ठिकाणांची तत्काळ दुरुस्ती करणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**जलसंधारणाच्या घोषणांना हरताळ?**

दरवर्षी पाणी बचतीबाबत जनजागृती केली जाते, विविध अभियान राबविले जातात आणि नागरिकांना पाणी वाचविण्याचे आवाहन केले जाते. मात्र शहरातील मुख्य जलवाहिनीतील अशा गळतीमुळे जलसंधारणाच्या घोषणांनाच हरताळ फासला जात असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

**प्रशासनाकडून कारवाईची अपेक्षा**

लाड चौक परिसरातील ही गळती तातडीने दुरुस्त करून जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी, तसेच शहरातील इतर ठिकाणीही अशाच प्रकारच्या गळतींचे सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# विधवा सन्मान : समाजाच्या प्रगल्भतेचा खरा आरसा

दि. २३ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय विधवा दिन' म्हणून जगभरात पाळला जातो. हा दिवस केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून समाजातील अत्यंत संवेदनशील, अनेकदा दुर्लक्षित आणि शांतपणे वेदना सहन करणाऱ्या विधवा स्त्रियांच्या जीवनातील वास्तवाकडे पाहण्याची एक गंभीर संधी आहे. समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकास, औद्योगिकीकरण किंवा तंत्रज्ञानातील प्रगतीने होत नाही, तर त्या समाजात दुर्बल घटकांना मिळणारे सन्मान, सुरक्षा आणि समान संधी यावरून खऱ्या अर्थाने ठरते. या निकषावर पाहिले असता विधवा स्त्रियांची स्थिती हा समाजाच्या अंतर्मनाचा आरसा ठरतो. हा आरसा आपल्याला केवळ प्रगती दाखवत नाही, तर अनेक ठिकाणी असलेल्या असमानता, परंपरागत मानसिकता आणि सामाजिक उदासीनतेचेही स्पष्ट प्रतिबिंब दाखवतो. त्यामुळे हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा दिवस आहे.
विधवा स्त्रीचे जीवन हे अचानक कोसळलेल्या भावनिक व सामाजिक भूकंपासारखे असते. विवाहानंतर मिळालेला सहजीवनाचा आधार, भावनिक सुरक्षितता, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक ओळख पतीच्या निधनानंतर एका क्षणात बदलून जाते. त्या क्षणी तिच्या जीवनात केवळ दुःख नसते, तर अनिश्चितता, भीती, जबाबदाऱ्या आणि संघर्ष यांचा मोठा डोंगर उभा राहतो. मुलांचे संगोपन, घराचा आर्थिक भार, समाजाचा दृष्टिकोन आणि स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न हे सर्व एकाच वेळी तिच्यासमोर उभे राहते. अशा परिस्थितीत अनेक स्त्रिया स्वतःच्या भावना बाजूला ठेवून कुटुंबासाठी जगण्याचा प्रयत्न करतात. त्या संघर्षाची किंमत मात्र समाज अनेकदा ओळखत नाही. हा अदृश्य संघर्ष या प्रश्नाची सर्वात मोठी शोकांतिका आहे.
भारतीय समाजाच्या इतिहासात स्त्रीचे स्थान अनेक बदलांमधून गेले आहे. प्राचीन काळात काही प्रमाणात स्त्रीला शिक्षण, संपत्ती आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग होता. परंतु कालांतराने सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक घटकांमुळे तिच्यावर बंधने वाढत गेली. विशेषतः मध्ययुगीन काळात सती प्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाहावर बंदी आणि कठोर सामाजिक रूढी यांनी स्त्रीचे जीवन अधिक कठीण केले. आधुनिक भारतात कायद्याच्या माध्यमातून या अमानुष प्रथांवर बंदी घालण्यात आली असली तरी समाजातील मानसिकता पूर्णपणे बदललेली नाही. आजही काही भागांमध्ये विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढींच्या चौकटीत अडकलेला दिसतो. त्यामुळे कायदेशीर प्रगती आणि सामाजिक मानसिकता यामध्ये एक मोठी दरी आजही अस्तित्वात आहे.
विधवा स्त्रियांच्या जीवनातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे आर्थिक असुरक्षितता. पतीच्या निधनानंतर कुटुंबाचा आर्थिक आधार अचानक नाहीसा होतो किंवा अत्यंत कमी होतो. ज्या स्त्रिया गृहिणी असतात, त्यांच्याकडे स्वतःचे उत्पन्नाचे साधन नसते. त्यामुळे त्या पूर्णपणे कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. हे अवलंबित्व अनेकदा त्यांच्या स्वाभिमानावर परिणाम करते. काही वेळा त्यांचा आर्थिक निर्णयांवर अधिकारही कमी होतो. वारसा हक्क, मालमत्ता, बँक व्यवहार आणि सरकारी लाभ याबाबत त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कायद्याने अधिकार दिले असले तरी प्रत्यक्ष जीवनात माहितीचा अभाव, कागदपत्रांची गुंतागुंत आणि सामाजिक दबाव यामुळे त्या अधिकारांचा उपयोग अनेकदा होत नाही. परिणामी आर्थिक स्वावलंबनाचा अभाव त्यांना दीर्घकाळ असुरक्षित ठेवतो.
सामाजिक दृष्टिकोन हा या प्रश्नाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. समाजात अजूनही काही ठिकाणी विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सहानुभूतीचा नसून उपेक्षेचा आहे. तिला शुभकार्यांपासून दूर ठेवणे, तिच्या वेशभूषेवर निर्बंध घालणे, तिच्या उपस्थितीला अशुभ मानणे किंवा तिला दुय्यम स्थान देणे अशा अनेक प्रथा काही भागांमध्ये आजही दिसतात. या प्रथा केवळ अंधश्रद्धा नसून त्या मानवी प्रतिष्ठेच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणाऱ्या आहेत. स्त्रीचे मूल्य तिच्या वैवाहिक स्थितीवर ठरवणे ही मानसिकता समाजाच्या प्रगतीला अडथळा निर्माण करते. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच असतो जिथे प्रत्येक व्यक्तीला तिच्या मानवी अस्तित्वावर सन्मान दिला जातो. मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत संवेदनशील असते. जीवनसाथीचा मृत्यू हा एक गंभीर भावनिक आघात असतो. त्या आघातातून सावरण्यासाठी वेळ, आधार आणि सहानुभूती आवश्यक असते. परंतु सामाजिक अपेक्षा इतक्या तीव्र असतात की स्त्रीला स्वतःच्या दुःखासाठीही वेळ मिळत नाही. तिला लगेचच कुटुंबाची जबाबदारी स्वीकारावी लागते आणि समाजाच्या नियमांनुसार वागावे लागते. या प्रक्रियेत तिच्या भावनांना व्यक्त होण्याची संधी मिळत नाही. एकटेपणा, नैराश्य, भविष्याची अनिश्चितता आणि भीती या भावना तिच्या मानसिक आरोग्यावर खोल परिणाम करतात. मानसिक आरोग्याचे प्रश्न अनेकदा दिसत नाहीत, परंतु त्यांचा परिणाम संपूर्ण जीवनावर होतो.
शिक्षणाचा अभाव आणि कायदेशीर जागरूकतेचा अभाव हे देखील मोठे अडथळे आहेत. ग्रामीण भागात अनेक स्त्रियांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची माहिती नसते. वारसा हक्क, पुनर्विवाहाचा अधिकार, सरकारी योजना, पेन्शन सुविधा आणि सामाजिक सुरक्षा योजना याबाबत अज्ञान असल्यामुळे त्या अनेक लाभांपासून वंचित राहतात. केवळ कायदे तयार करून उपयोग नाही; त्यांची माहिती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. कायदेशीर साक्षरता ही सक्षमीकरणाची पहिली पायरी आहे. माहितीशिवाय अधिकार निरर्थक ठरतात.
सरकारने विधवा स्त्रियांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. विधवा पेन्शन योजना, कौशल्य विकास कार्यक्रम, स्वयंरोजगार योजना आणि पुनर्वसन कार्यक्रम यांचा उद्देश त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे. मात्र या योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचताना अनेक अडचणी येतात. कागदपत्रांची गुंतागुंत, प्रशासकीय विलंब, माहितीचा अभाव आणि स्थानिक पातळीवरील उदासीनता यामुळे अनेक पात्र स्त्रिया या योजनांपासून दूर राहतात. त्यामुळे या योजनांची अंमलबजावणी अधिक सुलभ, पारदर्शक आणि मानवी दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. पुनर्विवाहाचा मुद्दा समाजात अजूनही संवेदनशील मानला जातो. काही ठिकाणी पुनर्विवाह स्वीकारला जातो, तर काही ठिकाणी त्याला विरोध केला जातो. परंतु पुनर्विवाह हा स्त्रीच्या जीवनातील नवीन सुरुवातीचा मार्ग ठरू शकतो.

## पान १ व ४ वरुन...

### विधान परिषद...

९७.७८ टक्के आणि अमरावतीमध्ये ९४.६८ टक्के मतदान झाले.

**विजयाचा कोटा कसा ठरतो?**

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत विजयी होण्यासाठी एकूण वैध मतांच्या ५० टक्के अधिक एक मत असा विजयाचा कोटा निश्चित करण्यात येतो. पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये कोणत्याही उमेदवाराला आवश्यक कोटा मिळाला नाही तर दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी केली जाते.
या पद्धतीमुळे प्रत्येक मताला विशेष महत्त्व प्राप्त होते आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधींच्या मतदानावर निकाल मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो.

**विजयी उमेदवार**

ठाणे मतदारसंघातून रवींद्र फाटक, यवतमाळमधून दुष्यंत चतुर्वेदी, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून अनिकेत तटकरे, पुण्यातून विक्रम काकडे, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूरमधून अरुण लखाणी आणि अहिल्यानगरमधून प्राजक्त तनपुरे हे बिनविरोध निवडून आले.
तर छत्रपती संभाजीनगर-जालनामधून सुहास शिरसाट, नाशिकमधून गोकुळ गिते, भंडारा-गोंदियामधून अविनाश ब्राह्मणकर, सांगली-सातारामधून धैर्यशील कदम, परभणी-हिंगोलीमधून सईद खान, सोलापूरमधून राजेंद्र राऊत, धाराशिव-लातूर-बीडमधून बसवराज पाटील, नागपूरमधून राजीव पोतदार, जळगावमधून नंदकिशोर महाजन, अमरावतीमधून प्रवीण पोटे आणि नांदेडमधून अमर राजूरकर यांनी विजय मिळवला.
राज्यातील या निकालामुळे महायुतीने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आपले वर्चस्व कायम राखल्याचे स्पष्ट झाले असून आगामी राजकीय घडामोडींवर या निकालाचा प्रभाव पडण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### जालना जिल्ह्यासाठी...

आहे.

**वीज पडण्याच्या घटनांपासून सावध राहण्याचे आवाहन**

मेघगर्जना आणि वीज पडण्याच्या घटनांमध्ये दरवर्षी अनेकांना जीव गमवावा लागतो. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने नागरिकांना विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे.
वादळी वातावरणात झाडाखाली उभे राहणे, उघड्या मैदानात थांबणे, वीजवाहिन्यांजवळ जाणे किंवा धातूच्या वस्तूंच्या संपर्कात राहणे धोकादायक ठरू शकते.
तसेच मोबाईलवर सेल्फी घेण्यासाठी धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**शेतकऱ्यांसाठी विशेष सूचना**

अवकाळी पाऊस, वादळी वारे किंवा संभाव्य गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान होऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करावे, असे प्रशासनाने सांगितले आहे.
शेतात काढून ठेवलेला किंवा बाजार समितीत विक्रीसाठी आणलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. जनावरांचेही सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
तसेच वादळी हवामानाच्या काळात शेतात काम करताना ट्रॅक्टर, लोखंडी अवजारे, मोटारसायकल किंवा विद्युत उपकरणांपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी**

मेघगर्जनेच्या वेळी झाडाखाली, उघड्या मैदानात, वीजेचे खांब, ट्रान्सफॉर्मर, मोबाईल टॉवर किंवा धातूच्या कुंपणाजवळ थांबू नये. जर एखादी व्यक्ती मोकळ्या जागेत अडकली असेल तर तिने जमिनीशी कमीतकमी संपर्क ठेवून गुडघ्यावर बसावे, डोके खाली घेऊन हातांनी कान झाकावेत, असे तज्ज्ञांनी सांगितले आहे.
घरातील नागरिकांनी वीज चमकत असताना अनावश्यक विद्युत उपकरणांचा वापर टाळावा.

**आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधा**

वादळी वारे, विजा किंवा अतिवृष्टीमुळे कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, संबंधित तहसील कार्यालय किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**प्रशासनाची तयारी**

हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर जिल्हा प्रशासनाने महसूल, आपत्ती व्यवस्थापन, कृषी विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.
कर्मचाऱ्यांना योग्य उपचार व मार्गदर्शन मिळू शकणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.
महानगरपालिका कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या माता-भगिनींना त्यांच्या लहान बालकांसह अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन कार्यालय परिसरात 'हिरकणी कक्षा'ची निर्मिती करण्यात आली आहे.
या कक्षामध्ये स्तनपान, बालकांना विश्रांती तसेच महिलांना सुरक्षित व सुसज्ज वातावरण उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली असून, या कक्षाचे उद्घाटन कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.
महिला व बाल कल्याण समितीच्या सभापतीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिल्या १०० दिवसांत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा, विकासकामांचा तसेच आगामी योजनांचा आढावा घेणाऱ्या कार्य-अहवाल पत्रिकेचेही प्रकाशन या प्रसंगी करण्यात येणार आहे.

### जालना मनपाच्या...

महिला सक्षमीकरण, बालकल्याण, आरोग्य, पोषण, बचत गटांचे बळकटीकरण आणि विविध सामाजिक उपक्रमांबाबत विभागाने केलेल्या कामांची माहिती या अहवालातून नागरिकांसमोर मांडण्यात येणार आहे. आयोजित करण्यात आलेल्या या बहुउद्देशीय आणि लोककल्याणकारी कार्यक्रमास शहरातील महिला, नागरिक, कर्मचारी तसेच विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती सौ. संध्या संजय देठे यांनी केले आहे.

### महात्मा फुले...

सांगितले. आंदोलनाचा इशारा बालभारतीने संबंधित मजकुराची तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. आवश्यक असल्यास संबंधित पाठ्यपुस्तकांचा निषेध करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणी लवकरच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार असून, बालभारती प्रशासनाविरोधात निषेध नोंदविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.
सामाजिक संघटनांची भूमिका महत्त्वाची
महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याला देशाच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यासंबंधी कोणतीही संदिग्ध अथवा चुकीची माहिती पाठ्यपुस्तकांमध्ये आढळल्यास ती तातडीने दुरुस्त करण्याची मागणी विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून पुढे येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### गटशिक्षणाधिकाऱ्यांचा...

पाणी, ग्रंथालय तसेच विविध शालेय नोंदींची सखोल तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचा आढावा घेत आवश्यक सूचना देण्यात आल्या.

**शिक्षकांना दिला गुणवत्ता वाढीचा मंत्र**

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीतून शिकविले, तर त्यांची समज,आकलनशक्ती आणि गुणवत्ता निश्चितपणे वाढते,''असे सांगत वाळके यांनी शिक्षकांना नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

**उपस्थित मान्यवर...**

या प्रसंगी राजूर केंद्राचे केंद्रप्रमुख पुंगळे, बरांजळा केंद्राचे केंद्रप्रमुख. विजय साबळे, मुख्याध्यापक गजानन घायवट तसेच शिक्षक सचिन वाघ,संतोष दारूवाले,श्रीमंत बरडे,अविनाश किनगे, सौ. सविता हिंगमिरे आणि सौ. पुष्पा गावंडे उपस्थित होते.

### बळीराजाच्या...

सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.
याशिवाय पीकविमा, बियाणे अनुदान, वीजबिल सवलत, सिंचनासाठी विशेष मदत आणि नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याची मागणीही शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे. पेरण्या लांबल्यास त्याचा परिणाम केवळ शेतकऱ्यांवरच नव्हे तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बियाणे विक्रेते, खत दुकानदार, शेती अवजार व्यावसायिक, मजूर आणि वाहतूक व्यवसाय यावरही त्याचे परिणाम दिसून येऊ शकतात.
कृषी अर्थव्यवस्था मंदावल्यास ग्रामीण बाजारपेठांमधील व्यवहारांवरही परिणाम होणार असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे.
जालना जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी सध्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. पाऊस लवकर झाला तर पिकांना नवजीवन मिळू शकते; अन्यथा दुबार पेरणी, वाढलेला खर्च आणि उत्पादन घट यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडू शकतो.
आकाशात ढग दाटत असले तरी पावसाचा एकही थेंब पडत नसल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसून येत आहे. धरणीमातेला शांत करणारा आणि बळीराजाच्या डोळ्यातील अश्रू पुसणारा समाधानकारक पाऊस कधी पडणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

ऐतिहासिक निकाल: पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीच्या रासायनिक लेपनास न्यायालयाची तात्काळ स्थगिती!

# मंदिर महासंघ आणि वारकरी संघटनांच्या याचिकेला मोठे यश


## मूर्तीचे पावित्र्य जपण्यासाठी धर्मशास्त्रीय भूमिकेचा विजय

पंढरपूर : कोट्यवधी हिंदूंचे आराध्यदैवत असलेल्या पंढरपूरच्या 'स्वयंभू' श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती आणि पुरातत्त्व विभागाकडून २३ आणि २४ जून रोजी प्रस्तावित असलेल्या रासायनिक वज्रलेपनास पंढरपूर येथील दिवाणी न्यायालयाने (कनिष्ठ स्तर) तात्काळ स्थगिती दिली आहे. वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करत, न्यायालयाने पुढील आदेश येईपर्यंत कोणत्याही प्रकारचे लेपन करण्यास मनाई केली आहे.

वारकरी संप्रदाय, श्री. बाळकृष्ण डिंगरे आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. पुरुषोत्तम (गणेश) लंके यांनी पंढरपूर येथील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती सोनाली राऊळ यांच्या न्यायालयात हा दावा दाखल केला होता. या प्रकरणी याचिकाकर्त्यांच्या वतीने अधिवक्ता सुधीर रानडे यांनी भक्कम युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने मंदिर समितीला वज्रलेप न करण्याविषयी सक्त ताकीद दिली आहे.

न्यायालयात मांडण्यात आलेले महत्त्वाच्या मुद्द्यांमध्ये हिंदु धर्मशास्त्रानुसार मूर्ती ही केवळ दगडी किंवा पाषाण शिल्प नसून त्यात साक्षात देवत्व (प्राण) असते. काकड आरतीपासून ते नैवेद्यापर्यंत सर्व कृती याच भावनेतून केल्या जातात. मंदिर समिती केवळ दगडाची मूर्ती समजून कृत्रिम आणि अपवित्र रासायनिक पदार्थांचा (उदा. इपॉक्सी) वापर करत आहे, ज्यामुळे मूर्तीचे देवत्व नष्ट होऊ शकते. आतापर्यंत ४ वेळा रासायनिक लेपन करूनही त्याचा फोलपणा सिद्ध झाला आहे. कृत्रिम रसायनांमुळे पाषाणाचे नैसर्गिक श्वसन रोखले जाऊन मूर्ती आतून अधिक ठिसूळ होण्याचा मोठा धोका आहे.

महाकालेश्वर मंदिर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचा न्यायालयात संदर्भ देण्यात आला. यानुसार भक्तांच्या धार्मिक भावना दुखावणारे



कोणतेही निर्णय प्रशासनाला घेता येणार नाहीत. करवीर पीठाच्या जगद्गुरु शंकराचार्यांनी या रासायनिक लेपनास स्पष्ट विरोध करणारे पत्र दिले असून, न्यायालयाने त्याचीही नोंद घेतली आहे.

या निर्णयावर समाधान व्यक्त करताना महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले,

तब्बल २८ युगे विटेवर सुखरूप उभा असणाऱ्या पांडुरंगाच्या मूर्तीच्या पायाला कोरोना टाळेबंदीच्या काळात खड्डा कसा पडला आणि श्री रुक्मिणीमातेचे पाय का खराब झाले? याचे कोणतेही शास्त्रीय उत्तर अद्याप मंदिर समिती किंवा पुरातत्त्व विभागाला देता आलेले नाही. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत केवळ मते नोंदवली गेली; मात्र कोणती रसायने वापरणार आणि संवर्धन कसे करणार याची कोणतीही स्पष्ट माहिती प्रशासनाने दिली नाही. अचानक पत्रक काढून मंदिर बंद ठेवत वज्रलेपाचा निर्णय जाहीर केल्याने भाविकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला. मूर्ती संवर्धनासाठी आयुर्वेदिक वज्रलेप हा अधिक सुरक्षित आणि परंपरेस अनुरूप असल्याचे आम्ही न्यायालयात सप्रमाण मांडले आहे.

यापुढील काळात तरी मंदिर समिती वारकरी, धर्माचार्य, संत-महंत आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या भावनांचा आदर करेल, अशी आम्हाला आशा आहे.

**आपला नम्र,**
**श्री. सुनील घनवट**
**राष्ट्रीय संघटक, महाराष्ट्र मंदिर महासंघ,**
**संपर्क: ७०२०३८३२६४**

# जालन्यात उन्हाचा कहर;सर्व शाळा सकाळच्या सत्रात

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी प्रशासनाची तातडीची पावले;पुढील आदेशापर्यंत शाळांची वेळ ७.३० ते १२ वाजेपर्यंत

**भोकरदन । प्रतिनिधी**

अल-निनोच्या प्रभावामुळे जालना जिल्ह्यात अद्यापही समाधानकारक पाऊस न झाल्याने उन्हाची तीव्रता कायम आहे.वाढत्या उष्णतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांच्या वेळेत मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, जालना जिल्ह्यातील मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनांच्या शाळा पुढील आदेशापर्यंत सकाळी ७.३० ते दुपारी १२.०० या वेळेत भरविण्यात येणार आहेत.



**उन्हाच्या झळांपासून विद्यार्थ्यांना संरक्षण**

सध्या जिल्हाभरात तापमानाचा पारा चढलेला असून विद्यार्थ्यांना उष्माघात,निर्जलीकरण आणि इतर आरोग्यविषयक समस्या उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.याच पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदींनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

**सर्व माध्यमांच्या शाळांना आदेश लागू**

या आदेशाचा लाभ जिल्ह्यातील सर्व शासकीय, जिल्हा परिषद, अनुदानित आणि खासगी व्यवस्थापनांच्या शाळांना मिळणार असून प्राथमिक ते माध्यमिक स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना सकाळच्या सत्रात शिक्षण दिले जाणार आहे.

**शिक्षण विभागाला तातडीच्या अंमलबजावणीचे निर्देश**

सदर आदेशाची प्रत शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक, विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापकांना पाठविण्यात आली असून तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**पालकांना दिलासा, विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित**

उन्हाच्या वाढत्या झळांमुळे चिंतेत असलेल्या पालकांसाठी हा निर्णय दिलासादायक मानला जात आहे.विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता सर्वोच्च मानून प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# पूर्व-मुद्रित संमतीपत्रावर स्वाक्षरी घेणे डॉक्टरांना पडले महागात; ग्राहक आयोगाकडून ७.५ लाखांची भरपाई

शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाला संभाव्य धोके आणि गुंतागुंतीची पुरेशी माहिती न देता केवळ एका पूर्व-मुद्रित संमतीपत्रावर सही घेणे हे सेवेतील त्रुटी असल्याचे राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाने एका महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले आहे. या प्रकरणात, एका नेत्र शल्यचिकित्सकाला दोषी ठरवत, रुग्णाला ७ लाख रुपये नुकसान भरपाई आणि ५०,००० रुपये तक्रार खर्चापोटी देण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.सविस्तर माहितीनुसार, तक्रारदार श्रीमती रजनी प्रकाश मलिक यांनी त्यांच्या डोळ्यातील दृष्टीच्या समस्येसाठी डॉ. अशोक टी. भोळे यांच्याकडे सल्ला घेतला. डॉक्टरांनी त्यांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला आणि ही एक सामान्य प्रक्रिया असून दृष्टी परत मिळण्याची खात्री दिली. शस्त्रक्रियेपूर्वी, एक औपचारिक प्रक्रिया म्हणून श्रीमती मलिक यांना एका पूर्व-मुद्रित संमतीपत्रावर सही करण्यास सांगण्यात आले. मात्र, यावेळी शस्त्रक्रियेचे स्वरूप, उपलब्ध असलेले पर्यायी उपचार किंवा त्यात असलेले संभाव्य धोके आणि गुंतागुंत याबद्दल कोणताही खुलासा करण्यात आला नाही. शस्त्रक्रियेमुळे कायमस्वरूपी दृष्टी जाऊ शकते किंवा डोळा गमवावा लागू शकतो, यासारख्या गंभीर धोक्यांची माहिती आपल्याला कधीच दिली गेली नाही, असे तक्रारदाराचे म्हणणे होते.४ जुलै २०११ रोजी शस्त्रक्रिया झाल्यानंतर, तक्रारदाराला डोळ्यात तीव्र वेदना, लालसरपणा, पाणी येणे आणि दृष्टी कमी होणे यांसारख्या समस्या जाणवू लागल्या. त्यांनी या समस्या डॉक्टरांच्या निदर्शनास आणून दिल्या असता, डॉक्टरांनी याला शस्त्रक्रियेनंतरची सामान्य लक्षणे म्हणून दुर्लक्षित केले आणि पुढील तपासणी न करता केवळ सामान्य उपचार सुरू ठेवले.

प्रकृती अधिकच खालावल्याने, त्यांना दुसऱ्या डॉक्टरकडे पाठवण्यात आले, जिथे त्यांना शस्त्रक्रियेनंतरची एक गंभीर गुंतागुंत झाल्याचे निदान झाले. यामुळे व्यथित होऊन, त्यांनी योग्य माहितीपूर्ण संमती न घेतल्याबद्दल आणि शस्त्रक्रियेनंतरच्या निष्काळजीपणामुळे ग्राहक आयोगाकडे धाव घेतली.डॉक्टरांनी आपल्या बचावात सांगितले की, मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्ण काळजी घेऊन आणि वैद्यकीय मानकांनुसार करण्यात आली होती. तसेच, शस्त्रक्रियेची प्रक्रिया आणि त्याचे परिणाम रुग्णाला समजावून सांगितल्यानंतरच त्यांची संमती घेण्यात आली होती. शस्त्रक्रियेनंतर योग्य उपचार आणि औषधे देण्यात आली होती आणि रुग्णाला दुसऱ्या केंद्रात पाठवण्याची गरज त्यावेळी भासली नाही, असा युक्तिवाद डॉक्टरांच्या वतीने करण्यात आला. डोळा गमावणे ही शस्त्रक्रियेतील एक ज्ञात गुंतागुंत असू शकते आणि यासाठी स्वतंत्र वैद्यकीय तज्ञांच्या पुराव्याअभावी डॉक्टरांना निष्काळजी ठरवता येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.आयोगाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे निरीक्षण नोंदवले की, सादर करण्यात आलेले संमतीपत्र हे केवळ एक पूर्व-मुद्रित प्रोफॉर्मा होते, ज्यावर तक्रारदाराची केवळ स्वाक्षरी होती. त्यामध्ये शस्त्रक्रियेचे विशिष्ट स्वरूप, संबंधित धोके, संभाव्य गुंतागुंत किंवा दृष्टी गमावण्याचा धोका याबद्दल कोणताही उल्लेख नव्हता. अशा छापील फॉर्मवर घेतलेली स्वाक्षरी ही कायदेशीररित्या वैध माहितीपूर्ण संमती मानली जाऊ शकत नाही, असे आयोगाने स्पष्ट केले. शस्त्रक्रियेतील वैद्यकीय निष्काळजीपणा सिद्ध करण्यात तक्रारदार अयशस्वी ठरले असले तरी, संमती घेण्याच्या प्रक्रियेत डॉक्टरांकडून स्पष्टपणे सेवेमध्ये त्रुटी झाल्याचे आयोगाने मान्य केले.या निकालावर भाष्य करताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''हा निकाल वैद्यकीय व्यावसायिकांसाठी एक धोक्याची सूचना आहे. केवळ एका छापील फॉर्मवर रुग्णाची सही घेणे हे कायद्याच्या दृष्टीने पुरेसे नाही. रुग्णाला शस्त्रक्रियेशी संबंधित सर्व लहान-मोठे धोके, त्याचे परिणाम आणि पर्यायी उपचार पद्धतींची सविस्तर माहिती देणे हे डॉक्टरांचे कायदेशीर आणि नैतिक कर्तव्य आहे. रुग्णाची संमती ही माहितीपूर्ण, ऐच्छिक आणि विशिष्ट असावी लागते. या निकालामुळे रुग्णांच्या हक्कांना बळकटी मिळाली असून, भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात अधिक पारदर्शकता येईल अशी अपेक्षा आहे.''

# केंद्र शासनाच्या स्टँड अप योजनेअंतर्गत उद्योजकांना अर्ज करण्याचे आवाहन

**जालना- प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंतीवर्ष भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन मोठ्या प्रमाणात साजरे करीत असताना यामध्ये केंद्र शासनाने २०१५ मध्ये स्टँड अप इंडीया ही योजना घोषित केली आहे. केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्यसा सवलती घेण्यास पात्र असलेला अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नवउद्योजक लाभार्थ्यांची मार्जिन मनी भरण्याची क्षमता नसल्यामुळे या नवउद्योजक लाभार्थ्यांना एकुण प्रकल्प किंमतीच्या लाभार्थी यांच्या हिश्श्यातील २५ टक्के मधील जास्तीत जास्त १५ टक्के मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यास फ्रंट एंड सबसिडी याद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीसाठीच्या सवलती घेण्यास पात्र असलेला अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नवउद्योजक यांनी १० टक्के स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टँड अप इंडिया योजने अंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजुर केल्यानंतर उर्वरीत फ्रंट एंड सबसिडी १५ टक्के राज्य शासनामार्फत देण्यात येईल. त्या अनुषंगाने जालना जिल्ह्यात इच्छूक उद्योजकांनी व जास्तीत जास्त महिला उद्योजिका यांनी प्रस्तुत कार्यालयास जास्तीत जास्त अर्ज करावेत व सदर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, डॉ. अनिता राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# अपघाताची वाट पाहताय का? भायडी शाळा व वरुड बु. ग्रामस्थांचा प्रशासनाला थेट सवाल

शाळकरी मुलांच्या जीवाशी खेळ थांबवा;गतिरोधकांसाठी दोन ठिकाणांहून निवेदनांचा भडिमार..

**भोकरदन - प्रतिनिधी**

भरधाव वाहनांच्या वेगामुळे शाळकरी विद्यार्थी,महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाल्याने भायडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि वरुड बु. ग्रामपंचायतीने प्रशासनाविरुद्ध सुरक्षेचा एल्गार पुकारला आहे.शाळेसमोर तसेच जुई धरण फाटावालसांवगी राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक ठिकाणी तातडीने गतिरोधक उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.



शाळेसमोर वेगवान वाहनांचा सुसाट कहर..जि.प. प्राथमिक शाळा भायडीसमोरील मुख्य रस्त्यावर दिवस-रात्र वाहनांची वर्दळ सुरू असते.अनेक वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.अपघाताची शक्यता लक्षात घेऊन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिपक ब्राम्हणे आणि मुख्याध्यापकांनी पोलीस प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे. निवेदनात शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ गतिरोधक उभारणे आणि 'शाळा परिसर वाहनांचा वेग कमी ठेवा' असा इशारा फलक बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.(२) राष्ट्रीय महामार्गावरही धोक्याची घंटा...दरम्यान, ग्रामपंचायत वरुड बु. यांनीही राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे निवेदन देत जुई धरण फाटा ते वालसांवगी दरम्यान दोन ठिकाणी गतिरोधक उभारण्याची मागणी केली आहे. विष्णू दादाराव वाघ (गट क्र. ५३७) आणि गुलाबराव तोताराम वाघ (गट क्र. ४४) यांच्या शिवाराजवळून वरुड बु. गावाकडे जाणारे प्रमुख रस्ते आहेत.या मार्गावरून दररोज शेकडो विद्यार्थी, नागरिक आणि ज्येष्ठ व्यक्ती ये-जा करतात.मात्र महामार्गावरील भरधाव वाहनांमुळे प्रत्येक क्षणी अपघाताचा धोका निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.(३)जीव गेल्यावरच जाग येणार का?ग्रामस्थांनी प्रशासनाला थेट प्रश्न विचारला आहे की,एखादा निष्पाप विद्यार्थी किंवा नागरिक अपघाताचा बळी गेल्यानंतरच गतिरोधक बसविण्याचा निर्णय होणार का?स्थानिकांच्या मते, वेळेत उपाययोजना केल्यास मोठी दुर्घटना टाळता येऊ शकते. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग विभागाने तातडीने संयुक्त पाहणी करून आवश्यक कार्यवाही करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# ३० जुन रोजी पेंशन अदालतची आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार दि. ३० जुन, २०२६ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी सा जिल्हा परिषद जालना यांच्या दालनात पेंशन अदालतीचे विभागनिहाय आयोजन करण्यात आले असून वेळापत्रक पुढीलप्रमाणे असेल शिक्षण विभाग प्राथमिक,कृषी विभाग, महिला व बालकल्याण विभाग सकाळी ११.०० ते ११.३०, सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, पंचायत विभाग, सिचन विभाग सकाळी ११.३० ते १२.००, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग, पशुसंवर्धन विभाग, समाजकल्याण विभाग दुपारी १२.०० ते १२.३० वाजता

या पेंशन अदालतीसाठी प्रलंबित प्रश्न अर्ज, पोस्टोन, ई-मेल किंवा हस्तपोच जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभाग जालना येथे दि. २५ जुन, २०२६ पर्यंत सादर करावेत. आयत्या वेळेत आलेले अर्ज, तक्रारींचया समावेश करण्यात येणार नाही अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प. यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जालना मनपाकडून कल्याणराव घोगरे क्रीडा संकुलात योग शिबिर; निरोगी जालना घडविण्याचा संदेश

**जालना । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने रविवारी सकाळी कल्याणराव घोगरे क्रीडा संकुल येथे विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी ६ ते ८ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात महानगरपालिकेचे लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, महापालिका शाळांतील शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. निरोगी शरीर, सुदृढ मन आणि तणावमुक्त जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे क्रीडा संकुल परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला होता. शेकडो सहभागींच्या उपस्थितीत विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान सत्रांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात योग प्रशिक्षक श्री. कुलकर्णी यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करून त्याचे आरोग्यदायी फायदे समजावून सांगितले. त्यांनी नियमित योगाभ्यासामुळे शरीराची लवचिकता वाढते, मानसिक तणाव कमी होतो, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि दैनंदिन जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे सांगितले. महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांनीही उपस्थितांना संबोधित



करत योगाचे महत्त्व विशद केले. योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून ती शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक संतुलन साधणारी जीवनशैली असल्याचे त्यांनी नमूद केले. योगाचा नियमित सराव केल्यास विविध आजारांपासून संरक्षण मिळते तसेच आरोग्यदायी जीवन जगण्यास मदत होते, असे आवाहन त्यांनी केले.

या योग शिबिराला महापौर वंदना अरुण मगरे, उपमहापौर राजेश राऊत, महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती संध्या देठे, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधींनी उपस्थिती लावली. महानगरपालिकेचे उपायुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर, नगरसचिव केशव कानपुडे तसेच विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी यांनीही सामूहिक योगाभ्यासात सहभाग घेतला. महापालिका शाळांतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने योगासनांमध्ये सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच योगाविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि आरोग्यदायी जीवनशैलीची सवय लागावी, या उद्देशाने त्यांचा विशेष सहभाग सुनिश्चित करण्यात आला होता. योगाभ्यासामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, मानसिक तणाव कमी होतो आणि शैक्षणिक प्रगतीसही मदत मिळते, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान अनुलोम-विलोम, कपालभाती, भ्रामरी यांसारख्या प्राणायाम प्रकारांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. तसेच ध्यान सत्राद्वारे मानसिक शांतता आणि एकाग्रतेचे महत्त्व सहभागींसमोर मांडण्यात आले.

दैनंदिन जीवनातील ताणतणाव, बदलती जीवनशैली आणि वाढत्या आरोग्य समस्या लक्षात घेता योग आणि ध्यानाचे महत्त्व अधिक वाढले असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून 'निरोगी नागरिक, सुदृढ समाज' हा संदेश देण्यात आला. आरोग्य संवर्धनासाठी योग हा प्रभावी आणि सर्वसामान्यांसाठी सहज उपलब्ध मार्ग असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. दोन तास चाललेल्या या योग शिबिराची सांगता राहुल देशमुख यांनी आभार प्रदर्शन करून केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महानगरपालिकेच्या विविध विभागांनी सहकार्य केले.

# बळीराजाच्या नजरा आता केवळ पावसाकडे...

**जालना -प्रतिनिधी**

राज्यात मान्सूनने सुरुवातीला दमदार हजेरी लावून शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित केल्या; मात्र जूनच्या उत्तरार्धात पावसाने अचानक विश्रांती घेतल्याने जालन्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील खरीप हंगाम गंभीर संकटात सापडला आहे. पावसाच्या खंडामुळे पेरणीची कामे ठप्प झाली असून, आधीच पेरणी केलेल्या पिकांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. विशेषतः कपाशी उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक आणि मानसिक तणावाखाली आले आहेत.

मराठवाड्यासह विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागांत ढग दाटून येत असले तरी अपेक्षित पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे खिळून राहिल्या आहेत. अनेक गावांमध्ये शेतातील उगवलेली पिके करपू लागली असून, मातीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे.

जूनच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी काही प्रमाणावर पेरण्या सुरू केल्या. जालना जिल्ह्यात कपाशी, सोयाबीन, तूर, मका आणि हळदीची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आली. मात्र पाऊस थांबल्याने पेरलेले बियाणे उगवूनही वाढ खुंटली आहे.

काही भागांमध्ये कपाशीचे उगवण झाले असले तरी जमिनीतील ओलावा संपल्यामुळे रोपे वाळण्यास सुरुवात झाली आहे. अनेक शेतकऱ्यांना आता पुन्हा बियाणे खरेदी करून दुबार पेरणी करावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**कपाशी उत्पादकांवर दुहेरी संकट**

जालना जिल्हा हा कपाशी उत्पादनासाठी ओळखला जातो. यंदा देखील मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी कपाशीची पेरणी केली; मात्र पावसाने पाठ फिरवल्याने कपाशीचे पीक सर्वाधिक धोक्यात आले आहे.

दुबार पेरणी करावी लागल्यास बियाणे, मशागत, मजुरी आणि सिंचनाचा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे. आधीच कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर ठरत आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विहिरी, बोअरवेल किंवा शेततळ्यांची सुविधा उपलब्ध आहे, त्यांनी ठिबक आणि तुषार सिंचनाच्या साहाय्याने पिके वाचविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. काही भागांमध्ये कपाशी व हळदीची लागवड सिंचनाच्या आधारे टिकवून ठेवण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु सततच्या उपशामुळे विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याची पातळी झपाट्याने खाली जात आहे. अनेक गावांमध्ये विहिरींचा तळ दिसू लागला असून, काही ठिकाणी पाणी उपलब्धतेचा कालावधी मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. भूगर्भातील पाण्याचा वाढता उपसा भविष्यातील पाणीटंचाईचे संकेत देत असल्याची चिंता जलतज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी हवामान खात्याच्या अंदाजांवर अवलंबून असतात. परंतु गेल्या काही दिवसांपासून व्यक्त करण्यात येणारे पावसाचे अंदाज प्रत्यक्षात फोल ठरत असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत. पावसाची शक्यता व्यक्त झाल्यानंतर अनेक शेतकरी पेरणी, खते टाकणे किंवा इतर कामांचे नियोजन करतात. मात्र प्रत्यक्षात पाऊस न पडल्याने आर्थिक नुकसान वाढत आहे.

हवामानातील स्थानिक बदल, कमी झालेली आर्द्रता आणि बदलती मान्सून प्रणाली यामुळे अंदाजांमध्ये तफावत निर्माण होत असल्याचे तज्ज्ञ सांगत असले तरी शेतकरी वर्गात नाराजी वाढत आहे. यंदाच्या हंगामात बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके आणि शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांच्या दरामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. ट्रॅक्टर मशागत, मजुरी आणि इंधन खर्चही वाढला आहे.

एकीकडे पाऊस नाही आणि दुसरीकडे उत्पादन खर्च वाढत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. ज्यांचे बियाणे वाया गेले आहे, त्यांना आता नव्याने महागड्या दराने बियाणे खरेदी करावे लागणार आहे.

**कर्जमाफीचा दिलासा; पण सरसकट मदतीची मागणी**

राज्य शासनाने दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केल्याने काही शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला तरी सध्याच्या परिस्थितीत ती अपुरी असल्याची भावना ग्रामीण भागात व्यक्त होत आहे. दुष्काळसदृश परिस्थिती, वाढलेला उत्पादन खर्च आणि दुबार पेरणीची वेळ लक्षात घेता सर्व शेतकऱ्यांना *(पान २ वर)*

## जाफ्राबाद शहरात जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात

### माजी मंत्री रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत शिबीर; हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**दत्ता देशमुख**

जागतिक योग दिनानिमित्त जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद येथे शनिवारी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम शिस्तीत आणि उत्साहात संपन्न झाला.



शिबिराच्या सुरुवातीला सामूहिक योगासनांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. यामध्ये सूर्यनमस्कार, प्राणायाम आणि ध्यानधारणा यासह विविध आसने नागरिकांनी एकत्रितपणे केली. यावेळी मार्गदर्शकांनी शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी असलेले योगाचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. या शिबिराला शहरातील विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जाफ्राबाद बाजार समितीचे सभापती गोविंदराव पंडित, डॉ. रमेश मोठे आणि साहेबराव मोरे

यांच्यासह लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविल्याने संपूर्ण मैदान योगमय झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि योग संस्थेच्या कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. आयोजकांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि दररोज सकाळी योगाभ्यासाची सवय लावण्याचे आवाहन केले.

**करा योग, रहा निरोगी**

"आजच्या धावपळीच्या जीवनात ताण-तणाव वाढला आहे. नियमित योगाभ्यासामुळे केवळ शरीरच नाही तर मनही निरोगी राहते. करा योग, रहा निरोगी हा संदेश प्रत्येक घराघरात पोहोचला पाहिजे. प्रत्येक नागरिकाने दररोज किमान तीस मिनिटे योगाभ्यास करून निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करावा."

**- रावसाहेब पाटील दानवे, माजी केंद्रीय मंत्री**

## देगलूर पोलिसांची मोठी कामगिरी; २५ गहाळ मोबाईल शोधून मालकांच्या ताब्यात

**देगलूर - प्रतिनिधी**

देगलूर पोलीस स्टेशनने गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत उल्लेखनीय यश मिळवित २५ मोबाईल फोन शोधून त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात दिले. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलची एकूण किंमत ₹३ लाख ७४ हजार ५०० इतकी आहे.

नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी यांच्या सूचनेनुसार ही मोहीम राबविण्यात आली. देगलूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या १५ दिवसांत गहाळ मोबाईल प्रकरणांचा आढावा घेत तांत्रिक तपासाला गती दिली. सीईआयआर पोर्टल, आयएमईआय ट्रॅकिंग तसेच विविध मोबाईल सेवा प्रदात्यांकडून प्राप्त झालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यात आला. या मोहिमेत मोबाईल शोध पथकाचे पोलीस हेड कॉन्स्टेबल के. जी. तलवारे यांनी विशेष परिश्रम घेतले.



तसेच डी.बी. पथकाने तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून मोबाईल हस्तगत करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या कारवाईत ओप्पो, व्हिवो, रियलमी, सॅमसंग, रेडमी, मोटोरोला, टेक्नो, लावा आदी कंपन्यांचे मोबाईल हस्तगत करण्यात आले. आवश्यक पडताळणी पूर्ण करून संबंधित फिर्यादींना त्यांचे मोबाईल परत देण्यात आले. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी पोलीस प्रशासनाचे आभार व्यक्त केले.आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून गहाळ मालमत्ता शोधण्यामध्ये देगलूर पोलिसांनी केलेल्या या कामगिरीमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

या यशस्वी मोहिमेबद्दल पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड, पो.हे.कॉ. के. जी. तलवारे तसेच डी.बी. पथकाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## औरंगाबाद - जालना स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून महायुतीचे सुहास शिरसाट विजयी



**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

विधानपरिषदेच्या औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचा निकाल आज जाहीर करण्यात आला.

या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार सुहास शिरसाट हे विजयी झाले आहेत. त्यांना ४५५ मते प्राप्त झाले आहेत. या निवडणुकीत तीन उमेदवार निवडणूक रिंगणात होते.

महाविकास आघाडीचे उमेदवार गणेश लोखंडे यांना १३५ मते प्राप्त झाली असून अपक्ष उमेदवार इसाक खान सांडू खान यांना ३५ मते प्राप्त झाली. पाच मते अवैध ठरले. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी निकाल जाहीर केला.

## समरसता लोकसंमेलनास लोककलावंतांनी हजर रहावे

**दत्ता देशमुख**



शासनाच्या वतीने समरसता लोककलावंत संमेलन बालगंधर्व रंगमंदिर, पुणे या ठिकाणी होत असून, महाराष्ट्रातील लोककलावंतांना ही एक पर्वणी आहे. महाराष्ट्रातून अनेक लोककलावंतानी या संमेलनास हजर रहावे, असे आवाहन जालना जिल्हा समन्वयक शाहीर नानाभाऊ परिहार व शाहीर रंगनाथ बिडवे यांनी केले आहे. लोककलावंतांसाठी हे महाराष्ट्रात शासकीय पहिले साहित्य संमेलन असून, पद्मश्री रघुवीर दादा

शाहीर नानाभाऊ परिहार खेडकर यांची संमेलन यांचे आवाहन

अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या संमेलनासाठी विशेष समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या विशेष प्रयत्नातून हे संमेलन घडून आले आहे. तयामुळे संमेलनासाठी महाराष्ट्रातून अनेक लोककलावंतानी या संमेलनास हजर रहावे, असे आवाहन जालना जिल्हा समन्वयक शाहीर नानाभाऊ परिहार व शाहीर रंगनाथ बिडवे यांनी केले आहे.

## लायन्सच्या हाँगकाँग येथील अधिवेशनासाठी जाणाऱ्या प्रतिनिधी मंडळाचा सन्मान सोहळा

**जालना - प्रतिनिधी**

लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४- एच २ च्यावतीने हाँगकाँग येथे होत असलेल्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनासाठी जाणाऱ्या प्रतिनिधी मंडळाचा सन्मान सोहळा रविवारी (ता. २१) मधुर बँक्वेट हॉलमध्ये अत्यंत उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी इंटरनॅशनल डायरेक्टर नवल मालू आणि लायन गीता मालू यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनियुक्त प्रांतपाल राहुल औसेकर होते, तर प्रांत प्रथम महिला लायन जयश्री औसेकर यांचीही व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या डिस्ट्रिक्टचे प्रतिनिधित्व करणे ही संपूर्ण भागासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे,




असे आणून, त्यांनी हाँगकाँगला जाणाऱ्या सर्व प्रतिनिधींना प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या. या सोहळ्याला प्रथम उपप्रांतपाल योगेशकुमार जायसवाल, द्वितीय उपप्रांतपाल सुप्रिया कोतवाल, माजी मल्टिपल काउन्सिल चेअरपर्सन जयेश ठक्कर, माजी प्रांतपाल राजेश राऊत, माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरीया, माजी प्रांतपाल विजय बागडिया, जालना लायन्स परिवाराचे अध्यक्ष सुभाषचंद्र देवीदान आणि रिजन चेअरपर्सन जयश्री लड्ढा यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनीही प्रतिनिधी मंडळाचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निमंत्रक सुनील बियाणी, सहनिमंत्रक अतुल लड्ढा, मोरेश्वर कुलकर्णी, जितेंद्र महाजन, सतीश देशपांडे, संजय गव्हाणे, आनंद देसाई, कमलबाबू झुनझुनवाला, संगीता बियाणी, शेखर कोतवाल, राजकुमार टिबडेवाल, रमेश पोखर्णा, संजीव गुप्ता, सोनाली जयपुरीया, जालना लायन्स क्लबचे अध्यक्ष गिरीश पाकणीकर यांच्यासह सदस्यांनी परिश्रम घेतले.

## प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्याकडून भ्रष्टाचाराचा आरोप; चौकशीची मागणी

### परतूर पंचायत समिती कार्यलय येथे उपोषण

**परतूर - प्रतिनिधी**

तालुक्यातील रोहिना बु. येथील रहिवासी गणेश रावसाहेब टोणपे यांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाचा लाभ मिळवून देण्यासाठी पैशांची मागणी होत असल्याचा गंभीर आरोप करत पंचायत समिती परतूर येथील गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, सन २०२५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत त्यांचे घरकुल



मंजूर झाले आहे. गावातील इतर अनेक लाभार्थ्यांना घरकुलाच्या सर्व हप्त्यांचा लाभ मिळून बांधकामे सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मात्र स्वतःला जाणूनबुजून त्रास दिला जात असून घरकुलाचा पुढील हप्ता मंजूर केला जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

तक्रारदाराने संबंधित घरकुल अभियंता व पंचायत समिती तील काही कर्मचाऱ्यांवर घरकुलाचा हप्ता मंजूर करण्यासाठी पैशांची मागणी केल्याचा आरोप केला आहे. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने पैसे देणे शक्य नसल्याचे सांगितल्यानंतरही कामात अडथळे निर्माण करण्यात येत असल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करावी तसेच मंजूर घरकुलाचा हप्ता तात्काळ वितरित करावा, अशी मागणी गणेश रासखाते डोणे यांनी प्रशासनाकडे केली आहे. दरम्यान, या तक्रारीमुळे प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासन या प्रकरणाची काय दखल घेते याकडे उपोषणकर्त्याचे लक्ष लागले आहे.

## बालविकास प्राथमिक शाळेत जागतिक योग दिन साजरा

**जालना - प्रतिनिधी**

कसबा येथील महिला मंडळ जुना जालना संचलित श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत २२ जून रोजी जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.

सहज योग ध्यान केंद्रतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. विद्याताई कुलकर्णी, सचिव सौ. सुनंदाताई बदनापूरकर, सहज योगच्या सौ. रोषणताई उढाण, सौ. अरुणा सर्वे, सौ. मंगल राऊत, सौ. रेखा पिसोरे, प्रल्हाद पिसोरे, शाळेच्या



मुख्याध्यापिका सुजाता परदेशी, ज्येष्ठ सहशिक्षिका छाया मुधोळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. परमेश्वरी कुंडलिनी शक्ती जागृतीचा प्रत्यक्ष अनुभव, अध्यात्मिक उत्थान, निरोगी जीवन, चिंतामुक्ती, आनंद, प्रेम, शांतीसाठी सहज सोपा ध्यान मार्गचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आले, या कार्यक्रमानंतर शाळेतील सहशिक्षिका श्रीमती शुभांगी भूमकर यांचे चिरंजीव वरद रवींद्र सोनार याने सीएची परीक्षा प्रथम प्रयत्नात यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्याने संस्था व शाळेच्यावतीने त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी रवींद्र सोनार व सोहम सोनार यांचीदेखील उपस्थिती होती. सूत्रसंचालन सहशिक्षक निलेश सिंदखेडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहशिक्षिका संध्या मुंडे यांनी केले, कार्यक्रमाचा समारोप सौ. विद्याताई कुलकर्णी यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.